डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, शेगाव, जि. बुलढाणा या वसतीगृहाच्या नविन बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: बीसीएच-२०१६/प्र.क्र.४०५/बांधकामे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२
दिनांक: १२ मार्च, २०१८.

वाचा :-

१) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र.बीसीएच-१०८५/१८४६४/(२०२)/ बीसीडब्लु-४, दि.१० सप्टेंबर,१९८५

२) आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. जा.क्र.सकआ/शिक्षण/बांधकाम/ प्र.मान्यता/२०१५-१६/१८५९ दिनांक ०७.०५.२०१६.

प्रस्तावना :-

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या दि. १० सप्टेंबर,१९८५ च्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीय मुलांसाठी ७५ विद्यार्थी क्षमतेची नवीन १७ शासकीय वसतीगृहे सुरु करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, शेगाव, जि. बुलढाणा येथील मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृहास मंजूरी देण्यात आली होती. त्यानुषंगाने कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, शेगाव, जि. बुलढाणा यांनी तयार केलेले व आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी त्यांच्या संदर्भ क्र. २ येथील पत्रान्वये सादर केलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, शेगाव, जि. बुलढाणा या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या रु.८,९१,७५,३४६/-(अक्षरी आठ कोटी एक्यान्नव लक्ष पंच्याहत्तर हजार तीनशे सेहचाळीस फक्त) इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

आयुक्त, समाजकल्याण आयुक्तालय, पुणे यांनी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतीगृह, शेगाव, जि. बुलढाणा, या वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या रु.८,२०,४१,०००/-(अक्षरी आठ कोटी वीस लक्ष एकेचाळीस हजार फक्त) रकमेचे अंदाजपत्रक प्रशासकीय मान्यतेकरिता शासनाकडे पाठविले आहे. सदर कामास मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील सचिव समितीच्या दि.१५.०२.२०१८ रोजीच्या बैठकीत मान्यता देण्यात आलेली आहे त्यास अनुसरुन सार्वजनिक बांधकाम विभागाने परिगणित केल्यानुसार रु.८,९१,७५,३४६/- (अक्षरी आठ कोटी एक्यान्नव लक्ष पंच्याहत्तर हजार तीनशे सेहचाळीस फक्त) इतक्या अंदाजित खर्चाच्या कामास पुढील अटींच्या अधीन राहून या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे. :-

अ) सदर काम सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत करण्यात यावे.

ब) काम सुरु करण्यापूर्वी नमुना नकाशा, मांडणी नकाशा तसेच विस्तृत नकाशास वास्तुविशारदांकडून मंजूरी घेऊनच सूरू करावे.

क) काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता करुन घ्यावी.

ड) ढोबळ स्वरुपात करण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रक तयार करुनच कामास तांत्रिक मान्यता द्यावी.

इ) प्रत्यक्ष काम करतेवेळी पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्रमांक इएनव्ही-२०१३/ प्र.क्र.१७७/ तां.क.१ दि.१०.१.२०१४ मध्ये उल्लेख करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

ई) तांत्रिक मान्यता प्रदान करण्यापूर्वी अंदाजपत्रकावर मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, अमरावती यांचे साक्षांकन आवश्यक आहे.

३. सदर मागासवर्गीय मुलांचे वसतीगृहाच्या इमारत बांधकामाच्या सविस्तर अंदाजपत्रकास सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता प्राप्त करताना अंदाजपत्रकात वसतीगृहास आवश्यक असणाऱ्या सोयी सुविधाचा अंर्तभाव करुनच, विहित नियमानुसार अटी व शर्ती निश्चित करुन ई-निविदा प्रसिध्द करण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग यांनी तात्काळ करावी.

४. या वर होणारा खर्च मागणी क्र. एन-४, मुख्य लेखाशिर्ष ४२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्ग यांच्या कल्याणावरील भांडवली खर्च, २७७-शिक्षण, पंचवार्षिक योजनां अंतर्गत योजना-राज्य योजनांतर्गत योजना, (०१) (०३) मागासवर्गीय मुलांमुलींसाठी शासकीय वसतीगृह बांधणे (४२२५ ०४८१), ५३-मोठी बांधकामे या लेखाशीर्षाखाली खर्ची घालून तो सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात करण्यात आलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमधून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८०३१२१७०९०३४२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Kondaji Ahire

Digitally signed by Anil Kondaji Ahire
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice and Special Assistance Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=9004dcdaa635070d60922aaa5dec8888d343a47356798e6c9cf27e4353d60e51, cn=Anil Kondaji Ahire
Date: 2018.03.12 17:10:12 +05'30'

(अ.कों.आहिरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) आयुक्त, समाजकल्याण, पुणे.
२) सचिव, (इमारती) सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय, मुंबई-३२.
३) मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, पुणे.
४) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,अमरावती.
५) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बुलढाणा.
६) महालेखापाल महाराष्ट्र १/२ (लेखापरीक्षा / लेखाअनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
७) प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, अमरावती.
८) सहायक आयुक्त, समाजकल्याण, बुलढाणा.
९) जिल्हा कोषागार अधिकारी, बुलढाणा.
१०) निवडनस्ती.